स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्पा अंतर्गत कार्यरत अंगणवाडीसेविकांची सामाजिक व शैक्षणिक भूमिका:

(विशेष संदर्भ — वाशिम जिल्हा)

मानवविज्ञान विद्याशाखे अंतर्गत समाजशास्त्र विषयात पीएच.डी पदवी मिळवण्यासाठी सादरकरावयाचा संक्षिप्त संशोधन आराखडा.

संशोधक विद्यार्थिनी
स्वाती अशोक गवई

मार्गदर्शक

प्रा. डॉ. आनेराव एम. एम.
(समाजशास्त्र विभाग)प्रमुख

लोकमान्य महाविद्यालय, सोनखेड
ता. लोहा जि. नांदेड

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्रे संकुल,
स्वामी रामानंद तीर्थमराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ऑगस्ट २०२४

एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्पा अंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविकांची सामाजिक व शैक्षणिक भूमिका

विशेष संदर्भ — वाशिम जिल्हा

(१) प्रस्तावना :

आपल्या भारत देशामध्ये सर्वप्रथम अंगणवाडी शिक्षणाची सुरूवात जवळपास १९व्या शतकात झाली. लार्ड कर्झन हा भारताचा व्हाईस रॉय असतानाच किडगार्डन पध्दतीची देशात सुरूवात झाली याचाच परिणाम आपल्या शिक्षण क्षेत्रात व समाजामध्ये दिसुन येतो. भारतात लहान मुलांच्या शिशू अवस्थेत अध्यापनाची व्यवस्था इ.स.स १८८७ पासुन आढळून येते. त्यावेळी बालकाचे वय ५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर शाळेत प्रवेश देण्यात येत असे. परंतू सोबतच ४ वर्षे असलेल्या मुलांना बालोद्यान पध्दतीचा वापर करून प्राथमिक शाळेतच तशी व्यवस्था करण्यात येत असे.

भारतात मद्रास जवळ अडयारला येथे इ.स. १८९४ मध्ये मॉटेसरी पध्दतीची पहिली शाळा सुरू करण्यात आली. मॉटेसरीचा प्रसार व प्रचार व्हावा या साठी भावनगर चे ताराबाई मोडक आणि गिजूभाई यांनी प्रयत्न केल्याचे दिसून येते. भारतामध्ये १८९६ ला मुंबई प्रांतात बडोदे जिल्हातील वसते या गावामध्ये मॉटेसरी शाळेची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र राज्यामध्ये २ ऑक्टोबर १९७५ रोजी अमरावती मधील धारणी तर मुंबई मधील धारावी मध्ये अंगणवाडीची सुरूवात करण्यात आली होती. त्याचा उद्देश हा बालकांच्या पोषण आहारामध्ये सुधारणा करणे आणि कुपोषण आणिबालमृत्युचे प्रमाण कमी करणे हा होता.

एकात्मिक बाल विकास सेवा योजना (ICDS)

(Integrated Child Development Services)

एकात्मिक बाल विकास सेवा योजना हा प्रकल्प केंद्र शासनाच्या महिला आणि बाल विकास या मंत्रालयाव्दारे राबविण्यात येणारा देशातील सर्वात मोठा आणि बहूउद्देशीय प्रकल्प आहे. महात्मा गांधीजींच्या १०६ व्या जयंती दिनी म्हणजे २ ऑक्टोबर १९७५ रोजी एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यक्रम या नावाने सुरू करण्यात आला. हा प्रकल्प प्रारंभिक बाल्य आवस्थेमधील विकास,काळजी घेण्यासाठी ज्या मध्ये शहरी — ग्रामिण, मागास व आदिवासी भागात वास्तव्य करणाऱ्या सहा वर्षापेक्षा कमी वय असलेल्या बालकांच्या विकासाकरिता आणि किशोरीसाठी व गर्भवती, स्तनदा माता साठी एकत्रितपणे सेवा

देण्यासाठी सुरू केला. बालकांच्या शारीरिक व मानसिक विकास, काळजी आणि पोषण तसेच आरोग्य या बाबींच्या संबधीत एकात्मिक बालविकास योजनेचा दृष्टीकोन आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची व्याप्तीएकात्मिक बाल विकास सेवा योजनेची अमलबजावणी करण्यासाठी अंगणवाडी केंद्राची निर्मिती साठी लोकसंख्येचे निकष ठरविण्यात आले.

क्षेत्र	ग्रामिण	शहरी	आदिवासी
समाविष्ठ लोकसंख्या/प्रकल्प	१,००,०००	१,००,०००	३५,०००
अंगणवाडी केंद्राची संख्या	१००	१००	१००
मिनी अंगणवाडी केंद्राची संख्या	१५० ते ४००	—	१५० ते ३००

अशा प्रकारे प्रकारे लोकसंख्येमागे अंगणवाडी केंद्र व मिनी अंगणवाडी केंद्राची निर्मिती करण्यात येते.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे लाभार्थी आणि सेवा

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या प्रकल्पात लाभार्थी हे सहा वर्षे पेक्षा कमी वय असलेली मुले म्हणजे ० ते ६ वर्षे वय असलेल्या बालकांचा समावेश होतो तसेच गर्भवती माता आणि स्तनदा माता यांचा देखील लाभार्थी मध्ये समावेश होतो. किशोर वयीन मुली म्हणजे वय ११ ते १८ वर्षे वयोगटातील आणि १५ ते ४५ वयोगटातील अन्य महिलांचा देखील लाभार्थी म्हणून समावेश होतो

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या सेवा एकाच ठिकाणी एकाच वेळेत सर्व लाभार्थ्यांना उपलब्ध करण्यात येतात. त्यांना देण्यात येणाऱ्या सेवा ह्या शालेय शिक्षणाशी, पोषण आरोग्य व प्रारंभिक बाल्य आवस्थेशी संबंधीत आहेत. या सेवा मध्ये पिण्याचे पाणी, महिलांचा विकास, सभोवतालची स्वच्छता, तसेच आरोग्य शिक्षण याचा समावेश होतो. बालकांची प्रारंभिक बाल्यावस्था व त्याची देखभाल आणि पूर्व शालेय शिक्षणामध्ये ३ ते ६ वर्षे पूर्ण केलेल्या मुलांना पूर्व शालेय शिक्षण उपलब्ध करून देण्यात येते. तसेच आरोग्य सेवा अंतर्गत लसीकरण, आरोग्य तपासणी, बाल्य अवस्थेतील सामान्य रोग आणि आजाराचा शोध घेवून त्यावर योग्य इलाज करण्यात येतात.

अंगणवाडी

भारत देशात अंगणवाडीची संख्या एकूण १३.७७ लाख आहे. त्यामध्ये महाराष्ट्र राज्यामध्ये १,०८,००५ अंगणवाडी कार्यान्वित असून १२.८ लाख अंगणवाडी सेविका असून त्यांना मदत करण्यासाठी मदतनिस म्हणून ११.६ लाख मदतनिस कार्यरत आहेत.

अंगणवाडी म्हणजे सरळ सोप्या भाषेत सांगायचे झाले तर ग्रामीण भागामध्ये अंगणाच्या परिसरात चालवली जाणारी माहिती केंद्र म्हणजे अंगणवाडी होय. तसेच Integrated Child Development Services (ICDS) हा कायक्रम अंगणवाडी म्हणून ओळखला जातो. ग्रामीण भागातील अंगणवाडी ही (ICDS)ची आधारशिला म्हणून ओळखली जाते. अंगणवाडी केंद्र चालविण्यासाठी एक पगारदार मानधनावर अंगणवाडी सेविकाची नियुक्ती करण्यात येते तसेच त्यांना एक मदतनिस सुध्दा कार्यरत असते. लोकसंख्येच्या निकसानुसार अंगणवाडी केंद्राची निर्मिती केली जाते.

महाराष्ट्र राज्यात (ICDS)एकात्मिक बाल विकास प्रकल्प ५५३ असून ३६४ ग्रामिण, ८५ आदिवासी आणि शहरी भागात १०४ प्रकल्प कार्यरत आहेत. महाराष्ट्र राज्यात एकूण आंगणवाडी केंद्र १३०११ असे एकूण अंगणवाडी केंद्र ११,०४८६ कार्यरत आहेत.

वरील स्पष्टीकरणावरून हे स्पष्ट होते की समाजामध्ये ग्रामीण व शहरी भाग तसेच आदिवासी भागामध्ये अंगणवाडी केंद्र किती महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. अंगणवाडी केंद्राचे महत्व दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. म्हणून आता नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शालेय शिक्षण देण्याची नविन जाबादारी अंगणवाडी केंद्रावर सोपविण्यात आली म्हणून वाशिम जिल्ह्यातील एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्पा अंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविकांची सामाजिक व शैक्षणिक भूमिकेचा अभ्यास करण्यासाठी या विषयाची निवड करण्यात आली.

वाशिम जिल्हा हा महाराष्ट्रातील विदर्भामध्ये येत असून मागास जिल्हा म्हणून ओळखला जातो. जानेवारी २०१८ मध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आकाक्षी जिल्हा म्हणून निवड केली. आकाशी जिल्ह्यामध्ये सामाजिक व आर्थिक विषय आरोग्य आणि पोषण, शिक्षण व कृषीया वर भर देण्यात येतो.

वाशिम जिल्हा हा शैक्षणिक दृष्टया मागासलेला आहे. त्यामूळे आकांक्षी प्रकल्पांतर्गत विविध कार्यक्रम राबवून जिल्ह्याचा विकासात हातभार लावला जात आहे.

आंगणवाडी सेविकांची कार्य

ICDSएकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्पांतर्गत अंगणवाडी सेविकांची नियुक्ती करण्यात येते. अंगणवाडी सेविकांना विविध योजनांची अमलबजावणी करण्यासाठी विविध कामे करावी लागतात, त्यामध्ये गावातील गरोदर माता, किशोरवयीन म्हणजे ११ ते १८ वर्षे वयोगटातील मुलींची आरोग्य तपासणी, गरोदर मातेचे लसीकरण, पूरक पोषण आहार, पोषण आणि आरोग्य शिक्षण या विषयी असलेल्या योजनांची अंमलबजावणी करण्याचे काम अंगणवाडी सेविकांवर असते. ० ते ६ वर्षे वयोगटातील यांचे सुध्दा पोषण आहार, लसिकरण, आरोग्य तपासणी, अनौपचारीक पूर्व शालेय शिक्षण या विषयी अनेक कामे करावी लागतात.

आंगणवाडी सेविकांचे सामाजिक स्थान

ग्रामीण व शहरी भागामध्ये अंगणवाडी सेविकांचे महत्वपूर्ण स्थान आहे. गावातील महिलांना त्यांचे आरोग्य विषयी व पोषण विषयी आरोग्याच्या समस्ये विषयी जवळची मैत्रिण म्हणून काम करावे लागते. विविध सर्वे करावी लागतात. कुपोषीत बालकांविषयी व त्यांचे वर देखरेख करण्याचे काम सुध्दा करावे लागते. ICDS विभागाने अंगणवाड्या मधील ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना देण्यात येणाऱ्या शाळापूर्व शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा करण्याचे काम करावे लागते.

आंगणवाडी सेविकांची शैक्षणिक भूमिका एक दृष्टीक्षेप

आपल्या भारतामध्ये बालकाविषयी अनेक कायदे निर्माण करण्यात आलेली आहेत. १९७४ साली 'राष्ट्रीय बाल धोरण' निर्माण करण्यात आले. त्यावर आधारीत महाराष्ट्र शासनाने सुध्दा २००२ मध्ये बालविकास धोरण निश्चित केले. भारतीय संविधानांत कलम ३९ (ई) व (एफ) मध्ये स्पष्ट उल्लेख केलेला आहे की 'बालकाच्या विकासासाठी सुयोग्य वातावरण तयार होईल असेच बालका विषयी धोरण राज्यांनी ठरवावे'. २००३ साली जी राष्ट्रीय सनद प्रसिध्द केली होती त्यामध्ये एक समृध्द बालक उपाशी किंवा आजारी राहणार नाही असे सांगितले होते. बालकाविषयी अनेक कायदे आहेत त्या मध्ये बाल न्याय (काळजी व संरक्षण कायदा (२०००,२००६ आणि २०११ सुधारित) मोफत व सक्तिचा शिक्षण कायदा (२००९), बालविवाह प्रतिबंधन कायदा (२००६) बाल कामगार प्रतिबंध कायदा, लैगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण करणारा कायदा (२०१२) अशी कायद्याची तरतूद केलेली आहे. या साठीच महाराष्ट्र राज्य बाल हक्क आयोग आणि एकात्मिक बाल विकास योजना विकसित झाल्या आहेत.

प्रारंभिक बाल्यावस्था आणि संगोपन हे अध्यायनाचा पाया समजण्यात येतो. राष्ट्रीय शिक्षण २०२० मध्ये स्पष्ट सांगितले आहे की, लहान बालकाच्या मेंदूच्या

एकंदरीत विकासापैकी ८५ % पेक्षा अधिक विकास हा वयाच्या ६ वर्षा पर्यंत होतो.

ECCE (Early Childhood Care and Education)प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण या मध्ये प्रथम प्राधान्याने बहूस्तरीय, लवचीक बहूपैलू खेळावर आधारीत, कृतीवर आधारीत आणि जिज्ञासावर आधारीत शिक्षणाचा समावेश करण्याम आला आहे.

NCERT (National Council of Educational Research and Training) ने ८ वर्षा पर्यंतच्या वयोगटातील बालकासाठी प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन व शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आणि शैक्षणिक आराखडा दोन भागामध्ये तयार केला असून पहिला भाग हा ० ते ३ वर्षे च्या बालकासाठी आणि दुसरा भाग ३ ते ८ वर्षेच्या बालकासाठी आहे. NCERT ने गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी व्यापक उद्दिष्ट ठेवले आहे. विशेषत: आर्थिक दृष्टया, व सामाजिक दृष्टया आणि शैक्षणिक दृष्टया वंचित असलेल्या जिल्ह्याकडे विशेष प्राधन्य दिले आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत प्रारंभिक बाल्यावस्था च्या शैक्षणिक संस्थाचा बळकटीकरण आणि त्यांचा विस्तार करण्याचे ठरले आहे. या मध्ये स्वतंत्र अंगणवाडया यांचा समावेश आहे. प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षणच्या सार्वत्रीकरणासाठी अंगणवाडी केंद्रांना दर्जेदार बनविण्यासाठी विशेष लक्ष्य दिले जाईल.

२) संशोधन विषय

एकात्मिक बालविकास सेवा प्रकल्प अंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविकांची सामाजिक व शैक्षणिक भूमिका:(विशेष संदर्भ – वाशिम जिल्हा) या विषयाच्या संदर्भात संशोधन केले जाईल. या संशोधनात वाशिम जिल्ह्यातील कार्यरत अंगणवाडी सेविकांची सामाजिक व शैक्षणिक भूमिका या बद्दल समाजशास्त्रीय अध्ययन करून वास्तविक तथ्यांचा शोध घेतला जाईल.

एकात्मिक बालविकास सेवा प्रकल्प हा बालकाच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. योजनाची अंमलबजावणी करण्याची महत्वाची जबाबदारी अंगणवाडी सेविकावर असते. अंगणवाडी सेविकांची सामाजिक व शैक्षणिक भूमिका काय आहे याचा आढावा या संशोधनात घेतला जाईल. अंगणवाडी सेविकाना विविध प्रकारची कामे करावी लागतात त्यामध्ये लसीकरण, पूरक पोषण आहार, आरोग्य तपासणी अनौपचारीक व पूर्व प्राथमिक शिक्षण या सारख्या कामाचा समावेश आहे. तसेच अंगणवाडी सेविकाना कुपोषणाबाबतची अधिक कामे करावी

लागतात. वाशिम जिल्ह्यात एका आकडेवारी नुसार ० ते ६ वर्षे वयोगटातील ९२,३७२ बालकांचे सर्वेक्षण करून त्यात वाशिम — १७८८९, रिसोड — १५१७५, मंगळवीर — १३,८९० मालेगाव — १८,३७४ आणि कारजा — ११३७८ व मानोरा तालूक्यातील १५७३७ बालकांचा समावेश करून सर्वेक्षण केले तर कुपोषीत श्रेणीत १७९ बालकांचा समावेश आढळून आला.

अंगणवाडी सेविकांची भूमिका महत्त्वाची आहे. बालकांच्या भावनिक, सामाजिक व शैक्षणिक विकास करण्याची फार मोठी जबाबदारी अंगणवाडी सेविकावर आहे. अंगणवाडी सेविकांचे अनेक प्रश्न सुध्दा आहे. त्यांना फारच कमी मानधनावर कार्य करावे लागते.

तात्पर्य— वाशिम जिल्हा हा कुपोषण, आकांक्षीत, मागासलेला जिल्हा असल्यामूळे बालकांचा सामाजिक, भावनिक, शैक्षणिक विकासामध्ये अंगणवाडी सेविकांची भूमिकांचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते म्हणून संशोधकाने ‘एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्पा अंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविकांची सामाजिक व शैक्षणिक भूमिका: (विशेष संदर्भ — वाशिम जिल्हा) या विषयाची निवड केली आहे.

३) संशोधन साहित्याचा आढावा

संशोधन कर्त्याला या आधी संबधीत विषयाच्या अनुषंगाने झालेल्या संशोधनाचा आढावा घेणे

आवश्यक आहे. या संशोधनाच्या संदर्भात या पूर्वी केलेल्या पीएच.डी, एमफील, रिसर्च पेपर, विविध मासिके व आंतरराष्ट्रीय मासिके, शासनाचे विविध अहवाल, सांख्यिकी माहिती या माध्यमातून प्रस्तूत संशोधनाच्या संदर्भात पूर्व संशोधनाचा आढावा पुढील प्रमाणे घेण्यात येईल.

संशोधनपूर्व साहित्याचा आढावा

1) Role of Community Development personel a Case Study of Mushari Block Anganwadi Worker’sसंशोधक — श्रीमती पूनम सिंग गर्ल्स हायस्कूल जूरान चोपरा मूझफरपूर बीहार यांनी सदरील संशोधन करून बाबासाहेब आंबेडकर बिहार युनिव्हरसिटीला संशोधनात Theory of Community Development and Anganwadi Schemeया वर प्रकाश टाकला आहे.
2) गडचिरोली जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन हे संशोधन संशोधक हेमंत केशवराव बारसागडे यांनी गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली ला सन २०१९ मध्ये सादर केलेले आहे. प्रस्तुत

संशोधनात त्यांनी अंगणवाडी केंद्र, अंगणवाडी कार्यकार्तीची जबाबदारी इत्यादी वर संशोधन करून आपला संशोधन अहवाल शासनाला सादर केला आहे.

3) Integrated Child Development Services Scheme – A now Dimention of Social Change Concerning Child Welfareया वर संशोधक उध्द्व सीन्हा यांनी १९८४ ला पटना विद्यापीठात सादर केलेले आहे. त्यांनी आपल्या संशोधनात Concert of Child Welfare the ICD'S Schemeयावर प्रकाश टाकला आहे.

4) महिला व बाल विकास महाराष्ट्र शासन यांचे बाल धोरण २०१४ या मध्ये बाल संगोपन विकास, जीवन आणि आरोग्य, पोषण, शिक्षण आणि विकास या विषयी आढावा घेण्यात आला.

5) अंगणवाडी प्रशिक्षण केंद्र यांच्या प्रशिक्षणाच्या परिणामाचे मूल्यमापन अहवाल अर्थ व सांख्यिकी संचलनालय, नियोजन विभाग महाराष्ट्र शासन मुंबइ यांच्या वतीने प्रसिध्द केला आहे.

6) Project Profile – Anganwadi Gujrat CSR Authorityया प्रोजेक्ट मध्ये अंगणवाडी विषयक आढावा घेण्यात आला आहे.

४)संशोधनाचे महत्वः—

प्रस्तूत संशोधनात एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प व त्या अंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविकांची सामाजिक व शैक्षणिक भूमिका महत्वाची आहे हे पुढील मुद्दयावरून स्पष्ट होते.

४.१)एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या विविध उपक्रमाचा अभ्यास करण्यात येईल.

४.२) वाशिम जिल्ह्यातील बालकांच्या सामाजिक, भावनिक व शारिरीक विकास जाणून घेण्याच्या दृष्टीने हे अध्ययन महत्वपूर्ण आहे.

४.३) वाशिम जिल्ह्यातील ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकाचा बौध्दिक विकासाचा अभ्यास करण्यात येईल.

४.४) वाशिम जिल्ह्यातील ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांच्या कुपोषणाच्या दृष्टीने कार्यरत अंगणवाडी सेविकांची भूमिका काय आहे याचे अध्ययन करण्यात येईल.

४.५) अंगणवाडी सेविकांची सामाजिक भूमिका जाणून घेण्याच्या दृष्टीने हे अध्ययन महत्वपूर्ण आहे.

४.६) अंगणवाडी सेविकांच्या समस्या आणि त्यांच्या कडे समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन जाणून घेण्यासाठी या अध्ययनाचे महत्व आहे.

या सर्व बाबीच्या अनुषंगाने 'एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्पा अंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविकांची सामाजिक व शैक्षणिक भूमिका विशेष संदर्भ. वाशिम जिल्हा या विषयाची निवड करण्यात आली.

५) संशोधनाची उद्दिष्टये :—

एकात्मिक बाल विकास योजना संपूर्ण भारतामध्ये राबविण्यात येतो. त्यामुळे प्रस्तूत अध्ययन विषयाची व्यापकता लक्षात घेता केवळ वाशिम जिल्ह्यातील एकात्मिक बाल विकास योजना अंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविकांची सामाजिक व शैक्षणिक भूमिका काय आहे याचे समाजशास्त्रीय अध्ययन करण्यात येईल. संशोधन करीत असताना वेळेची बचत श्रम आणि संशोधनाचा योग्य तो वापर करण्यात यावा आणि पैसा यांस योग्यती दिशा मिळावी तसेच संशोधनाची उद्दिष्टये साध्य झाली पाहिजेत या साठी प्रस्तूत संशोधनात पुढील उद्दिष्टये ठेवण्यात आली आहेत.

५.१) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत विविध उपक्रमाचा अभ्यास करणे.

५.२) वाशिम जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांची सामाजिक भूमिकेचा अभ्यास करणे.

५.३) वाशिम जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांची शैक्षणिक भूमिका काय आहे याचे अध्ययन करणे

५.४) वाशिम जिल्ह्यातील ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांचा सामाजिक, शैक्षणिक आणि बौध्दिक विकासाचे अध्ययन करणे

५.५) वाशिम जिल्ह्यातील कार्यरत अंगणवाडी सेविकांचा समस्यांचा अभ्यास करणे.

५.६) नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील तरतूदी नूसार शैक्षणिक कार्यात अंगणवाडी सेविकांची भूमिका काय आहे यांचे अध्ययन करणे.

६) संशोधनाची गृहितके :—

प्रस्तूत संशोधनाच्या विषयाच्या संदर्भात पुढीलप्रमाणे गृहितके निश्चित करण्यात आली आहेत.

६.१) एकात्मिक बाल विकासाच्या प्रक्रियेत बालक व माता यांच्या सामाजिक, शैक्षणिक व बौध्दिक विकासात अंगणवाडी सेविकांची महत्वाची भूमिका आहे.

६.२) एकात्मिक बाल विकासात सेवा प्रकल्प योजनेमूळे बाल मृत्यु आणि माता मृत्यु चे प्रमाण कमी होत आहे.

६.३) एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प योजनेमूळे शिशू व मातांचे आरोग्य सदृढ होण्यास मदत होत आहे.

६.४) ग्रामीण भागातील अपूऱ्या सोयीसुविधामुळे एकात्मिक बाल विकास प्रकल्प योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यास अडचणी येत आहेत.

६.५) ग्रामीण व शहरी भागामध्ये आजही कुपोषण आढळून येत आहे.

७) संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :—

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती व मर्यादा पुढील प्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

७.१) प्रस्तुत संशोधन हे वाशिम जिल्ह्यापुरतेच मर्यादित राहील.

७.२) प्रस्तुत संशोधन हे वाशिम जिल्ह्यातील कार्यरत अंगणवाडी सेविका पूरतेच मर्यादित राहिल.

७.३) प्रस्तुत संशोधन हे एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत प्रकल्पा पूरतेच मर्यादित राहिल.

७.४) प्रस्तुत संशोधन हे अंगणवाडी सेविकांची सामाजिक व शैक्षणिक भूमिके पूरतेच मर्यादित राहिल.

८) संशोधनाचा आराखडा :—

प्रस्तूत संशोधनाचा आराखडा पुढील प्रमाणे राहिल.

८.१) सदरील संशोधनासाठी एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्पा अंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविकांची सामाजिक व शैक्षणिक भूमिकेचे अध्ययन करण्यासाठी अन्वेषणात्मक व निशनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करून संशोधन करण्यात येईल. प्रस्तूत संशोधन हे सर्वेक्षण स्वरूपाचे आहे, तसेच सांख्यिकीय विश्लेषण करण्यात येत असल्यामूळे संशोधकाने विविध सांख्यिकी तंत्राचा उपयोग करून वारंवारीता, शेकडा प्रमाण, आलेख याचा देखील उपयोग करण्यात येईल.

८.२) नमूना निवड

अंगणवाडी सेविकाची सामाजिक व शैक्षणिक भूमिका यांचे समाजशास्त्रीय अध्ययन साठी तथ्य संकलीत करण्यासाठी गैर संभाव्यता नमूना निवड पध्दती अंतर्गत सहेतूक पध्द्तीचा वापर करून उत्तरदात्याची निवड करण्यात येईल. उत्तरदात्याची निवड करतांना पूर्वग्रह दुषितपणा येणार नाही याची काळजी घेण्यात येईल. प्रस्तूत संशोधनासाठी वाशिम जिल्ह्यातील एकूण ६ तालूके १) वाशिम २) कारंजा ३) मंगरूळपीर ४) मनोरा ५) रिसोड ६) मालेगाव यांचा विचार करण्यात येईल. प्रत्येक तालूक्यातील प्रत्येकी ५० — ५० कार्यरत अंगणवाडी सेविकांची निवड करण्यात येईल. प्रस्तूत अध्ययनासाठी गैरसंभाव्यता नमूना निवड पध्द्ती अंतर्गत सहेतूक पध्द्तीचा वापर करून एकूण ३०० कार्यरत अंगणवाडी सेविकांची निवड केली जाणार आहे.

८.३)तथ्य संकलनाची तंत्रे

कोणत्याही विषयाचा तुलणात्मक अभ्यास करण्यासाठी एकापेक्षा जास्त संशोधन पध्द्तीचा वापर करावा लागतो. प्रस्तूत संशोधन हे सर्वेक्षणात्मक स्वरूपाचे असल्याने अशा संशोधनास अनुकूल असणाऱ्या संशोधन पध्दतीची निवड करण्यात येईल.या संशोधनासाठी प्राथमिक तथ्य संकलन व दुय्यम तथ्य संकलनाच्या विविध साधनांचा उपयोग केला जाईल.

८.३.१) प्राथमिक माहिती स्त्रोत (Primary Data)

प्रस्तूत संशोधनास प्राथमिक माहितीच्या स्त्रोतासाठी संशोधकांनी वाशिम जिल्ह्यातील कार्यरत अंगणवाडी सेविकाच्या सामाजिक व शैक्षणिक भूमिकेचा अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण, निरिक्षण, मुलाखत अनुसूची, प्रत्यक्ष भेटी याद्वारे प्राथमिक स्त्रोताचे संकलन करण्यात येईल.

८.३.२) दुय्यम माहिती स्त्रोत (Secondary Data)

प्रस्तूत संशोधनासाठी संशोधनकर्त्याने दुय्यम माहिती स्त्रोताचा उपयोग तथ्य संकलन करण्यासाठी वापरले जाणार आहेत. प्रस्तूत विषयाच्या अनुषंगाने संदर्भ पुस्तके, दैनंदिनी, व्यक्तिगत प्रलेख, वर्तमानपत्रे, मासिके, शासकीय गॅझेट

एकात्मिक बाल विकास सेवाचे अहवाल संशोधन अहवाल, इंटरनेट प्रकाशित अप्रकाशित इत्यादी साधनांच्या माध्यमातून तथ्य संकलन करण्यात येईल.

९) संशोधन अहवालाची मांडणी :—

प्रस्तूत संशोधनाची मांडणी ही शोध प्रबंधाच्या अनुषंगानेअध्ययन विषय एकूण सहा प्रकरणामध्ये मांडण्यात येतील.

९.१) प्रकरण पहिले :— प्रस्तावना

शोध प्रबंधाच्या या पहिल्या प्रकरणामध्ये प्रस्तावना त्यामध्ये अंगणवाडी ची सुरूवात, एकात्मिक बाल विकास सेवा योजना व योजनेची व्याप्ती, भारतातील अंगणवाडी ची स्थिती, वाशिम जिल्ह्याची माहिती, अंगणवाडी सेविकांची कार्य, अंगणवाडी सेविकांची शैक्षणिक भूमिका, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०मध्ये अंगणवाडीचे महत्व इत्यादी अनुषंगिक घटकांची स्पष्टीकरणात्मक मांडणी करण्यात येईल. तसेच शेवटी संशोधनपूर्व साहित्याचा आढावा संबधीत संदर्भ ग्रंथातील अध्ययन विषयाच्या अनुषंगाने घेतला जाईल.

९.२) प्रकरण दुसरे :— संशोधन पध्द्ती

प्रस्तूत संशोधनाच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये अध्ययनाच्या अनुषंगाने प्रस्तावना, संबधीत संशोधन विषयाची ओळख, प्रस्तूत विषयाची निवड, संशोधन कार्य क्षेत्राची निवड, संबधीत संशोधन विषयाची मर्यादा, प्रस्तूत कार्य क्षेत्राची ओळख, वाशिम जिल्हा : एक दृष्टीक्षेप या मध्ये वाशिम जिल्ह्याचे स्थान आणि भौगोलिक स्थिती, लोकसंख्या, शिक्षणाच्या सोई, वैद्यकिय आणि आरोग्य शिक्षणाची स्थिती इत्यादी ची मांडणी करण्यात येईल. तसेच संशोधनाची गृहितके, उद्दिष्टये, संशोधन आराखडा, नमूना निवड, तथ्य संकलनाची तंत्रे, तथ्य संकलन, तथ्याचे वर्गीकरण, सामग्री संस्करण, विश्लेषण व अर्थ निर्वचन इत्यादी पध्द्तीचा वापर करून शास्त्रीय कसोटयाची मांडणी केली जाईल.

९.३) प्रकरण तिसरे :— उत्तरदात्यांची वैयक्तिक माहिती

शोधप्रबंधाच्या अनुषंगाने प्रस्तूत प्रकरणात वाशिम जिल्ह्यातील कार्यरत अंगणवाडी सेविकांची सामान्य माहिती घेण्यात येईल.

९.४) प्रकरण चौथे :— अंगणवाडी सेविकांचा सामाजिक व शैक्षणिक सहभाग

प्रस्तूत संशोधनाच्या चौथ्या प्रकरणामध्ये वाशिम जिल्ह्यातील कार्यरत अंगणवाडी सेविकाचा म्हणजेच उत्तरदात्यांची ग्रामीण व शहरी विकास कार्याप्रती

आवड, अंगणवाडी सेविका बनण्याची प्रेरणा, अंगणवाडी सेविकांना नेमून दिलेल्या कामाविषयी सहभाग, उत्तरदात्या कुटूंबातील सामाजिक व शैक्षणिक पार्श्वभूमी, कुपोषण निवारण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न, आरोग्याच्या विविध योजना मध्ये सक्रिय सहभाग व त्याची अमलबजावणी, शालापूर्व शिक्षणाची जबाबदारी व सहभाग विषयक प्रतिक्रिया, विश्लेषण इत्यादी चलांच्या माध्यमातून मूलाखत अनुसुचीच्या माध्यमातून तथ्य संकलीत केले जाईल.

९.५)प्रकरण पाचवे :— अंगणवाडी सेविकांची नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील भूमिका

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत प्रारंभिक बाल्यावस्थाच्या शिक्षणावर अंगणवाडी सेविकावर विशेष जबाबदारी टाकण्यात आली. या नविन राष्ट्रीय शिक्षण धोरणात अंगणवाडी ना देण्यात येणाऱ्या सोयीव सेवाचा आढावा घेण्यात येईल. नविन शैक्षणिक धोरणा आधी व नंतर कोणते बदल झाले याची माहितीचे अध्ययन करण्यात येईल. अंगणवाडयांना मिळणारा निधी विषयक माहितीचे अध्ययन करण्यात येईल. शाळा पूर्व शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शासकीय योजनाची माहिती, शासकीय योजनाचा लाभ, एकात्मिक बाल विकास प्रकल्पाच्या योजना, शैक्षणिक सवलतीचा लाभ इत्यादी चलाचे अध्ययन करण्यात येईल.

९.६) प्रकरण सहावे :— निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तूत प्रकरणामध्ये उत्तरदात्याच्या संकलीत केलेल्या तथ्यांच्या आधारे संशोधकांनी केलेल्या निष्कर्षाची मांडणी केली जाईल. या अध्ययनाच्या आधारे अंगणवाडी सेविकांची सामाजिक व शैक्षणिक भूमिका अनुषंगाने येणाऱ्या अडचणी आणि विविध समस्यावर उपाय योजना करण्यासाठी शिफारशी सुचविल्या जातील.

१०) संदर्भ ग्रंथ सुची :—

१) आगलावे प्रदिप, २००९ 'संशोधन पध्दती व तंत्रे', विद्या प्रकाशन, नागपूर

२) सचदेव डी आर, (जानेवारी २०१०) 'भारतातील समाज कल्याण व समाजकल्याण प्रशासन,' के सागर पब्लिकेशन पुणे.

३) बालधोरण, २०१४ 'महिला व बालविकास विभाग महाराष्ट्र शासन मुंबई'.

४) Anganwadi Project Profile Gujrat CSR Authority 2016.

५) अंगणवाडी प्रशिक्षण केंद्र व मध्यमस्तर प्रशिक्षण केंद्र यांच्या प्रशिक्षणाच्या परिणामाचे मूल्यमापन अहवाल सन २०२१ — २२ अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग महाराष्ट्र शासन मुंबई.

६) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१७ वाशिम जिल्हा अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन मुंबई.

७) राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० शिक्षण मंत्रालय भारत सरकार

८) जिल्हा परिषद नाशिक ची वेब साईट

९) जिल्हा परिषद वाशिम ची वेब साईट

संशोधक विद्यार्थिनी **मार्गदर्शक**

स्वाती अशोक गवई

प्रा. डॉ. आनेराव एम. एम.
(समाजशास्त्र विभाग प्रमूख)
लोकमान्य महाविद्यालय सोनखेड
ता. लोहा जि. नांदेड